# सातार्‍यात शिवसेनेची पडझड सुरूच

## उद्धव ठाकरे यांच्या पुढे नव्याने संघटन बांधणीचे आव्हान

**कराड : प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यात शिवसेनेच्या ठाकरे गटाची पडझड सुरूच आहे. मंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली प्रमुख पदाधिकार्‍यांसह जुने-जाणते शिवसैनिकही वरिष्ठ नेत्यांवर नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात सामील झाले. लोकप्रतिनिधी, स्थानिक प्रभावी नेत्यांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केल्याने जिल्ह्यात ठाकरे समर्थक म्हणून कोण उरणार हा सध्या चर्चेचा आणि कुतूहलाचा विषय झाला आहे.

जिल्ह्यातील विधानसभेच्या आठपैकी दोन मतदारसंघांवर वर्चस्व तसेच 'गाव तिथे शाखा', प्रभागनिहाय संघटन असलेल्या शिवसेनेचे पाटणचे विधानसभा सदस्य, मंत्री शंभूराज देसाई आणि कोरेगावचे विधानसभा सदस्य महेश शिंदे यांनीच सर्वप्रथम बंडाचा झेंडा फडकवल्याने उद्धव ठाकरेंनी जनाधाराचे दोन नेते गमावले. तर, महाविकास आघाडीत राज्यमंत्री असलेल्या शंभूराज देसाईंना कॅबिनेट मंत्रिपदी बढती मिळाल्याने त्यांच्या कामाचा झपाटाही चांगलाच वाढला आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे हे मूळचे याच जिल्ह्यातील. त्यामुळे त्यांना घरच्या मैदानावर म्हणून आपल्या नेतृत्वाचा राजकीय प्रभाव ठेवणे स्वाभाविक असल्याने त्यांची संघटन बांधणी गती घेऊन आहे. पूर्वीपासून अनेकांशी असलेले थेट संबंध आणि सेनेतील वरिष्ठांच्या धोरणावर नाराज असलेल्या मंडळींना एकत्र करून मुख्यमंत्री शिंदे हे आपला गट विस्तारत आहेत. दुसर्‍या, तिसर्‍या फळीतील नेत्यांबरोबरच क्रियाशील शिवसैनिकालाही शिंदे गटात सामील करून सक्रिय केले जात आहे. शिंदे गटात सहभागी होणारे बहुतेक जण शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांबरोबरच विशेषत: संपर्कप्रमुख प्रा. नितीन बानुगडे-पाटील यांच्यावर नाराजी व्यक्त करत आहेत.

शिवसेनेचे प्रमुख संघटन असलेल्या युवासेनेचे जिल्हाप्रमुख रणजितसिंह भोसले यांनी संपर्कप्रमुखांवर नाराजी व्यक्त करीत नुकतेच आपल्या कार्यकर्त्यांसह मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांचे नेतृत्व स्विकारले. मंत्री शंभूराज देसाई व जिल्ह्यातील शिंदे गटाचे नेतेही या वेळी उपस्थित होते. भोसलेंसह महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शारदा जाधव, विद्यार्थी सेना जिल्हाप्रमुख संभाजीराव पाटील, माथाडी विभागाचे जिल्हाप्रमुख प्रशांत शिंदे आदींसह सात उपजिल्हाप्रमुख व पंधरा तालुका प्रमुखांनी शिंदे गटाला बळ दिले आहे. दरम्यान, शिवसेनेचे २०१९च्या विधानसभा निवडणुकीतील 'कराड उत्तर'मधील उमेदवार व 'वर्धन ग्रो'चे अध्यक्ष धैर्यशील कदम यांनीही ठाकरे गट सोडत भाजपात प्रवेश केला. एकंदरच शिवसेनेची ठाकरे गटातील गळती पाहता ठाकरे यांच्यापुढे जिल्ह्यातील गटाचे अस्तित्व वाचवण्याचे आव्हान आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभाग गतिमानतेसाठी १५ सप्टेंबर रोजी राज्यव्यापी कार्यशाळा

## मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे गतिमान व कायापालट करण्याच्या दृष्टीने व विभागाची कार्यपध्दती अधिक दर्जेदार व सक्षम करण्यासाठी अभियंता दिनाचे औचित्य साधून सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली १५ सप्टेंबर रोजी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत विभागातील अभियंत्यांच्या नवनीवन संकल्पना व योजना यांचे सादरीकरण होणार आहे. या कार्यशाळेस राज्यातील सर्व विभागीय मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता उपस्थित राहणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग असे सुमारे ९८ हजार किमीच्या रस्त्यांची नवीन कामे तसेच देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात. सध्याच्या परिस्थितीत यामधील काही रस्त्यांची पुनर्बांधणी करणे आवश्यक असून त्या दृष्टीने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. राज्यातील ब्रिटीशकालीन पूल, इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील येत असून हे पूल व इमारती आणि रस्ते यांचा दर्जा अधिक सुधारण्याचे आव्हान राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आहे. त्या दृष्टीने या कार्यशाळेमध्ये सविस्तर चर्चा व मार्गदर्शन होणार आहे.

१५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता षण्मुखानंद सभागृह, सायन येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये विविध ठिकाणच्या रस्त्यांवरील अपघात प्रवण क्षेत्र दुरुस्तीच्या अनुषंगाने करावयाच्या अधिक सक्षम उपाययोजना, नाविन्यपूर्ण प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने नियोजनबध्द आराखडा तयार करणे व रस्ते, पूल बांधणी यामध्ये नवीन साहित्य, व अत्याधुनिक तंत्रज्ञान याचा वापर करणे आदी सर्व बाबींवर सविस्तर चर्चा व तज्ञांचे मार्गदर्शन या कार्यशाळेत होणार आहे.

# रायगडात दुर्गम भागातील विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी 'निळी परी' ठरतेय वरदान

## पेण, कर्जत, रोहा आगारातून एसटी बसेस उपलब्ध

**अलिबाग : प्रतिनिधी**

दर्‍याखोर्‍यात, डोंगरभागात राहणार्‍या मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी मानव विकास योजनेंतर्गत गाव ते शाळा-महाविद्यालयापर्यंत निळ्या रंगाची एसटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. या योजनेद्वारे रायगड जिल्ह्यातील पेण, रोहा, कर्जत एसटी बस आगारातून सात एसटी बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. ही 'निळी परी' आदिवासी व मागास प्रवर्गातील मुलींच्या शिक्षणासाठी वरदान ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एसटी महामंडळ वेगवेगळे उपक्रम राबवित असताना डोंगरभागात राहणार्‍या मुलींच्या शिक्षणाला गती देण्याचा प्रयत्न एसटी महामंडळाने घेतला आहे. वाहतुकीच्या सुविधा नसल्याने वाड्या-वस्त्यांमध्ये राहणार्‍या मुलींचे अर्धवट शिक्षण राहते. त्यांना शाळा, महाविद्यालयापर्यंत शिक्षण घेता येत नाही. त्यामुळे अनेक मुलींचे लवकरच लग्न लावले जाते. त्याचा परिणाम बालके कुपोषित होण्याची भीती अधिक असते. बालविवाह रोखण्याबरोबरच कुपोषित बालकांचर प्रश्न मार्गी लावण्यासाठी तसेच आदिवासी पाड्यांमध्ये राहणार्‍या मुलींना पाचवीपासून बारावीपर्यंत तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे यासाठी एसटी महामंडळाची 'निळी परी' वरदान ठरली आहे.

रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये १० ते १५ गावांसाठी एक माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आहे. या शाळेपासून वेगवेगळ्या गावांचे अंतर तीन ते १५ किलोमीटर इतके आहे. वाहतूक सुविधेअभावी मुली आठवीनंतरचे शिक्षण घेऊ शकत नाही.

या सर्व मुलींना बारावीपर्यंतचे शिक्षण देण्यासाठी एसटी महामंडळाकडून मोफत एसटी बस वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील रोहा, पेण, व कर्जत तालुक्यात आदिवासी, ठाकूर समाजातील मुली मोठ्या प्रमाणात आहेत. या वाड्या-पाड्यांमधील मुलींना शिक्षणाची दारे खुली करून देण्यासाठी मानव विकास योजनेंतर्गत रोहा, पेण व कर्जत या एसटी बस आगारात निळ्या रंगाच्या सात एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# कोळी बांधवांच्या प्रामाणिकपणामुळे सोन्याची चेन गणेशभक्ताला मिळाली परत

**पनवेल : वार्ताहर**

कोळी बांधवांच्या प्रामाणिकपणामुळे विसर्जनाच्या वेळी गणरायाच्या गळ्यात असलेली सोन्याची चेन पुन्हा गणेशभक्ताला मिळाल्याची घटना पनवेल शहरातील कोळीवाडा विसर्जन घाट येथे घडली आहे.

रोहिदास वाडा येथे राहणारे मयूर दत्तात्रेय खैरे यांच्या गणपतीचे विसर्जन कोळीवाडा येथील विसर्जन घाट येथे करण्यात आले. खैरे कुटुंबियांनी गणरायाच्या गळ्यात एक तोळे वजनाची सोन्याची चेन घातली होती, परंतु विसर्जनाच्या वेळी चेन गळ्यातून काढण्यास हे कुटुंब विसरले.

गणरायाचे विसर्जन झाल्यावर त्यांच्या ही बाब लक्षात आली. तातडीने मयूर खैरे यांनी त्यांचे मित्र किरण भोईर याला याबद्दल सांगितले. त्या वेळी विसर्जन घाटावर समर्थ भगत, केतन, अनिकेत व



इतर सहकारी उपस्थित होते. त्यांना ही बाब समजताच ते पुन्हा खोल खाडीमध्ये उतरल होते.

खैरे यांच्या मूर्तीची बैठक वेगळी असल्याने खैरे यांच्या गणेशाची मूर्ती सापडली. गणेशाच्या गळ्यात गळ्यात घातलेली चेन जशी तशी होती हे पाहून खैरे कुटुंबियांनी बाप्पा मोरयाचा गजर केला व कोळी बांधवांचे मनापासून आभार मानले.


यावेळी पंच कमिटी व स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या उपस्थितीत ही चेन खैरे कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आली.

# नवी मुंबईत लवकरच दोन सीबीएसई शाळा

## आमदार गणेश नाईक यांना आयुक्तांचे आश्वासन

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार गणेश नाईक यांच्या शिक्षण व्हीजन धोरणानुसार नवी मुंबईमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देणार्‍या सीबीएसई शाळा सुरू झाल्या. सुरुवातीला दोन शाळा होत्या. या शाळांना मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता आमदार नाईक यांनी आणखी दोन शाळा सुरू करण्याची सूचना महापालिका प्रशासनाला केली होती, त्यानुसार आणखीन दोन शाळा मंजूर झाल्या होत्या. परंतु त्या अद्याप सुरू झालेल्या नाहीत. महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्याबरोबर झालेल्या बैठकीमध्ये नाईक यांनी हा महत्त्वाचा विषय उपस्थित करीत वाढीव सीबीएसईच्या दोन शाळा तातडीने सुरू करण्याची मागणी केली. त्यावर आयुक्त बांगर यांनी शिक्षणाधिकार्‍यांची बैठक लगेचच घेऊन हा विषय मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन आमदार नाईक यांना



दिले आहे.

बैठकीमध्ये त्यांनी शिक्षण आरोग्य प्रदूषण पाणीटंचाई या विषयांना वाचा फोडली. नेरूळमध्ये असलेल्या पालिकेच्या सीबीएसई शाळेमधून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही ही अडचण माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी आमदार नाईक यांच्या माध्यमातून आयुक्तांना अवगत करून दिली. या दोन मजली शाळा इमारतीवर आणखी दोन मजले चढविण्याची मागणी त्यांनी केली. त्यास आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. कोपरखैरणेमध्ये असलेल्या पालिकेच्या शाळांमधून विद्यार्थ्यांची बसण्याची गैरसोय होते आहे. कोपरखैरणे सेक्टर दोन येथे पालिकेची एक इमारत बांधून तयार असल्याने या प्रशस्त इमारतीमध्ये विद्यार्थ्यांना वर्ग खोल्या उपलब्ध करून देण्याची मागणी माजी नगरसेवक शंकर मोरे यांनी केली ती आयुक्तांनी मान्य केली. महापालिकांमधील शिक्षण मंडळे शासनाने बरखास्त केली असून या शिक्षण मंडळाचे महत्त्व पाहता शिक्षण मंडळ पुनर्स्थापित करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती आमदार गणेश नाईक यांनी आजच्या बैठकीत दिली. तसेच विकास आराखड्याबाबत मत दशरथ भगत यांनी या वेळी व्यक्त केले.

### घणसोलीचे मैदान खेळासाठी आरक्षित करा

**घणसोलीमध्ये खेळासाठी आरक्षित मैदान आहे. परंतु नवीन प्रस्तावित विकास आराखड्यामध्ये त्याचे आरक्षण बदलून स्मशानभूमीसाठी हा भूखंड आरक्षित करण्यात आला आहे. घणसोलीमध्ये खेळण्यासाठी पुरेशी मैदाने नाहीत. संबंधित खेळाच्या मैदानाची देखभाल फोर्टी प्लसचे सदस्य गेली अनेक वर्षे उत्तम प्रकारे करीत आहेत. या मैदानावर घणसोलीतील विविध क्रीडा स्पर्धा होत असतात. त्यामुळे या मैदानावरील स्मशानभूमीचे आरक्षण काढून हा भूखंड केवळ खेळासाठीच राखीव ठेवावा अशी मागणी आमदार नाईक यांनी केली.**

### फेरीवाला झोन तयार करावा

**नवी मुंबई शहरातील एकूण फेरीवाल्यांपैकी सुमारे ६० ते ७० टक्के फेरीवाले बाहेरील शहरातून येतात त्यांचा त्रास नवी मुंबईकरांना होतो. अनधिकृत फेरीवाल्यांची समस्या समूळ नष्ट करण्यासाठी आमदार नाईक यांनी पालिका प्रशासनाला महत्त्वाचे उपाय सुचवले. शहरात तातडीने फेरीवाला झोनची निर्मिती करावी. सिडकोकडून भूखंड प्राप्त करून त्या भूखंडावर फेरीवाल्यांचे पुनर्वसन करावे. जेणेकरून वर्दळीच्या ठिकाणी या फेरीवाल्यांचा त्रास नागरिकांना होणार नाही अशी मागणी माजी महापौर जयवंत सुतार यांनी केली.**

# पोलीस असल्याची बतावणी करून तरुणाला लुटले

**पुणे :** पोलीस असल्याच्या बतावणीने महाविद्यालयीन तरुणाला धमकावून त्याला लुटल्याची घटना नर्‍हे भागात घडली. या प्रकरणी सिंहगड पोलिसांकडून तोतया पोलिसाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका महाविद्यालयीन तरुणाने फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण नर्‍हे भागातील एका सोसायटीत राहायला आहे.


महावितरण

**(Short) ई-निविदा सुचना**

**खालील नमूद केलेल्या कामासाठी अनुभवी सरकारी / निमसरकारी खात्यात आणि महावितरण कंपनित नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.**

| ई-निविदा क्रमांक : | कामाचे नाव | कालमर्यादा | अंदाज पत्रक रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| टी-४६/ २०२२-२३ | O&M सर्कल, IT केंद्र, प्रशिक्षण केंद्र २२ के.व्ही. नियंत्रण कक्ष, फ्लाईंग स्क्वॉड ऑफिस आणि शाखा कार्यालय पेण जिल्हा रायगड साठी दैनंदिन देखभालीची कामे करणे. | १२ महिने | ६,१०,८००.०० | ६२००.०० |

ई-निविदा सुचना आणि वरील कामासंबंधीची कागदपत्रे आमच्या संकेतस्थळ www.mahadiscom.in वर उपलब्ध आहेत. कोर्‍या निविदेची रक्कम ऑनलाईन भरावी तसेच इसारा रक्कम रोखीने अथवा ऑनलाईन निविदा अपलोड करण्याच्या दिवशी अथवा पूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, दुसरा मजला, विद्युत बिल्डींग, एल.बी.एस. मार्ग भांडुप (प) येथे भरावी. तसेच इसारा रक्कम म.रा.वि.वि. कंपनीच्या नियमाप्रमाणे फक्त कार्यालयीन वेळेत ई निविदेमध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये मंजुर करण्यात येईल. निविदा विक्रीचा कालावधी दि. **१४.०९.२०२२ ते २२.०९.२०२२** पर्यंत व ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी दिनांक **२३.०९.२०२२** रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. शक्य असल्यास सादर केलेल्या ई-निविदा दि. **२३.०९.२०२२** रोजी दुपारी ०३.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**कार्यकारी अभियंता (स्था) भांडुप**



पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**बुधवार, दि. १४ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**




भाजप कार्यकर्ते निलेश बामा पाटील, दिघोडे, उरण



उरण : अभिषेक दिनेश जैन यांच्या घरी विराजमान गौरा गणपतीचे भाजप नगरसेवक राजेश ठाकूर यांनी दर्शन घेतले.

# पनवेल एसटी स्थानकात चोरीच्या घटनांमध्ये वाढ

## डेपोतील पोलीस चौकी दिसेनाशी; जागा बदलण्याची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल एसटी स्थानकावर पाकीटमार व महिलांच्या अंगावरील दागिने पळविण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. अशा घटना घडल्यास त्वरीत पोलिसांशी संपर्क साधण्यासाठी एसटी स्थानकात पोलीस चौकी उभारण्यात आली आहे, मात्र सद्यस्थितीत ही पोलीस चौकी दिसेनाशी झाली आहे. त्यामुळे वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पनवेल एसटी स्थानकावरील पोलीस चौकीची जागा बदलून ती स्थानकाच्या मध्यवर्ती भागात घ्यावी, अशी मागणी प्रवाशांसह कर्मचारीही करीत आहेत.



पनवेल एसटी स्थानक हे मध्यवर्ती स्थानक असल्याने येथे कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील मोठ्या संख्येने एसटी गाड्या येत असतात. याशिवाय या स्थानकावरून मुंबई, ठाणे, कल्याण, कोकण परिसर, तालुक्यातील विविध गावात जाणाऱ्या गाड्यांची संख्याही मोठी आहे. येथे हजारो प्रवाशी दररोज चढ-उतार करीत असतात.

सकाळी व सायंकाळी गाड्यांना जाण्यासाठी मोठी गर्दी असते. याचा फायदाच पाकीटमार घेतात. अनेक वेळा महिलांच्या गळ्यातील दागिने पळवले जातात. या वेळी पोलिसांची मदत घ्यायची झाल्यास पोलीस चौकी शोधावी लागते. येथील पोलीस चौकी ही बसस्थानकापासून लांब शौचालायच्या बाजूला आहे. या चौकीच्या बाजूला एसटीच्या गाड्या उभ्या केलेल्या असतात. त्यामुळे चौकी दिसून येत नाही. त्यामध्ये अनेक वेळा पोलीस नसतात.

**पनवेल स्थानकावरील पोलीस चौकी एका बाजूला असल्याने दिसत नाही. त्यामुळे स्थानकाच्या आवारात गुन्हेगारी प्रवृत्तीचे अनेक जण निर्धास्तपणे फिरत असतात. गर्दीच्या वेळी ते महिलांच्या गळ्यातील दागिने खेचतात, मोबाइल किंवा पर्स खेचून पळून जातात. पोलीस चौकी जवळ असल्यास त्यांना पोलिसांचा धाक वाटेल, यासाठी पोलीस चौकीची जागा बदलणे आवश्यक आहे.**
**-संगीता जाधव, प्रवासी**

बसस्थानकाच्या मध्यवर्ती भागात पोलीस चौकी घेतल्यास मुंबई, कल्याण, कोकणात, घाटावर व स्थानिक भागात जाणाऱ्या गाड्याच्या फलाटावर पोलिसांचे लक्ष राहिल. एखादी घटना घडल्यास त्वरित पोलीस तेथे पोहचतील. पोलीस जवळ असल्याने पाकीटमारांनाही त्यांचा धाक राहिल. त्यामुळे पनवेलचे पोलीस निरीक्षक कादबाने यांनी लक्ष देऊन पोलीस चौकीची जागा बदलावी अशी मागणी प्रवाशांसी व एसटी स्थानकातील कर्मचारीही करीत आहेत.

# पनवेलमधील वाकडी येथे पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपने वचनपूर्ती करीत वाकडी येथे नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याची टाकी बांधण्यात येणार आहे. भाजप वाकडी, ग्रामपंचायत यांच्या पाठपुरव्याने व भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे नळ पाणीपुरवठा योजना राबवली जाणार आहे.

या योजनेच्या कामाचे भूमिपूजन मंगळवारी (दि. १३) पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. ही योजना ८० लाख खर्चून राबवली जाणार आहे. या वेळी उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी सरपंच नरेशशेठ पाटील, माजी सरपंच नामदेव जमदाडे, माजी उपसरपंच ॲड. अरूण पाटील, उपसरपंच मंगेश पाटील, संतोष पाटील, गणेश खुटले, ईसाक शेख, आप्पा जमदाडे, बळीराम कांबळे, सीताराम जमदाडे, गणेश पाटील, अमीत जमदाडे, इब्राहीम शेख आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची कास धरावी -अरुणशेठ भगत

## गव्हाण विद्यालयात अकरावी प्रवेशोत्सव; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची कास धरावी व परिश्रम करून जीवनात यश मिळवावे, असे आवाहन रयत संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता अकरावीचा प्रवेशोत्सव सोहळा मंगळवारी (दि. १३) झाला.



या सोहळ्यासाठी स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, जुनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, प्रा. राजेंद्र चौधरी, प्रा. माणिकराव घरत, प्रा. जयवंती ठाकूर व प्रा. अर्चना पाटील आणि विद्यार्थी उपस्थित होते.

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी व मान्यवरांनी गुलाबपुष्प देऊन अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. अनिता पुरोहित हिने विद्यार्थिनी मनोगतामध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांना सुयश चिंतले. प्रातिनिधीक स्वरूपात दुर्गा शिंदे, मोहसीन सिद्दीकी, विघ्नेश कोळी व कमलेश कसबे या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे यांनी केले. प्रा. राजू खेडकर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. उमेश पाटील यांनी आभार मानले.

# खोपटे गावातील शेतकरी केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या भेटीला

**उरण : बातमीदार**

उरण-उसर प्रोपेन गॅस पाईपलाइनसंदर्भात खोपटे गावातील शेतकऱ्यांनी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. गॅस पाईपलाइनसंदर्भात ग्रामस्थांना येणाऱ्या समस्यांविषयी त्यांना निवेदन देऊन समस्या सोडविण्याची मागणी करण्यात आली.



या पाईपलाइनमुळे खोपटेतील धसाखोशी, कोप्रोली, मोठी जुई, कळंबुसरे, केळवणे, दिघाटी, साई गावातील शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे ही पाईपलाइन रद्द करण्यात यावी किंवा तिचा मार्ग बदलण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ३(१) च्या आलेल्या नोटीसचे हरकतीचे फॉर्म गेल इंडिया कंपनीला बेलापूर येथील त्यांच्या कार्यालयात देण्यात आले आहेत.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर यांच्यासह महेश भगत, चांगदेव ठाकूर व मनोहर म्हात्रे हे उपस्थित होते. निवेदन स्वीकारताच खासदार कपील पाटील यांनी लगेचच संबंधित उपजिल्हाधिकारी अश्विनी पाटील यांना संपर्क करून या पाईपलाइन संदर्भात चर्चा केली आणि लगेचच गेल (इंडिया) लिमिटेड कंपनीला पत्रक लिहिले.



**पनवेल : परदेशी आळी येथील श्री नवनाथ मित्र मंडळातर्फे गौरा गणपती उत्सवानिमित्त मंगळवारी श्री क्लिनिकचे डॉ. गजेंद्र सिलिमकर व श्रीकांत किल्लेकर, उन्नती हॉस्पिटल आणि आयसीयुच्या वर्षदा पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, डॉ. नितीन पोवळे, गोपाळ भोईर, प्रसाद हनुमंते, महेश ठेकेकर, वाहतूक निरीक्षक गणेश खांडेकर यांनीही सहभाग नोंदविला.**



**उरण : येथील नगर परिषदेच्या नगरसेविका रजनी कोळी यांच्या घरी विराजमान झालेल्या गौरा गणेशाचे लहानग्यांनी दर्शन घेतले.**


# गौरा गणेश दर्शन




नवीन पनवेल येथील गायकवाड परिवारातर्फे बसविलेला गौरा गणपती.



हरेश शंकर म्हात्रे, केळवणेपाडा, पनवेल



तृप्ती मच्छींद्र म्हात्रे, पाले, उरण




नितीन शेडगे, दिघाटी, पनवेल



पनवेल ग्रामस्थ मंडळ कोंडले यांच्यातर्फे विराजमान गौरा गणपती.



पडघेचे माजी सरपंच तथा भाजप पनवेल मनपा प्रभाग २चे अध्यक्ष कृष्णा पाटील यांच्या निवासस्थानी नातेवाईकांनी गणेश दर्शन घेतले.



मानव पाटील, दिघाटी, पनवेल

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३५

### निकाल पुढीलप्रमाणे

१. येत्या ३० सप्टेंबर २२ पासून कोणत्या कंपनीचा निफ्टी ५० मध्ये समावेश होणार आहे?
ई. अदानी इंटरप्रायजेस

२. पुढीलपैकी कोणत्या देशाचा पहिल्या पाच अर्थव्यवस्थेमध्ये समावेश होत नाही?
इ. फ्रान्स

३. ऑगस्ट २२ मध्ये जीएसटीचे एकूण संकलन किती झाले आहे?
अ. १.४४ लाख कोटी रुपये

**अर्थसाक्षर स्पर्धा ३५या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३५साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे?**
*अ.* ४.३ कोटी *आ.* ५.५ कोटी *इ.* १० कोटी *ई.* ७.४ कोटी

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
*अ.* जिओ *आ.* भारती एअरटेल
*इ.* व्होडाफोन आयडिया *ई.* टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
*अ.* एचडीएफसी बँक *आ.* आयसीआयसीआय बँक
*इ.* कोटक महिंद्रा बँक *ई.* स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# विरोधकांची कोल्हेकुई

वेदांत समुह आणि फॉक्सकॉन या बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपनीच्या संयुक्त प्रकल्पाला अखेर गुजरातने आपल्याकडे ओढले. त्याबद्दल राष्ट्रीय पातळीवर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या महाप्रकल्पाला जे लोक राष्ट्रीय पुनर्उभारणीचा भाग मानतात त्यांनी आनंद व्यक्त केला, तर काही असंतुष्ट विरोधकांनी त्याबाबत नेहमीप्रमाणे राजकारण करण्याचा डाव साधला.

**वेदांत समुह ही मोठी भारतीय कंपनी असून फॉक्सकॉन ही तैवानची इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील मोठा दबदबा राखून असलेली बहुराष्ट्रीय कंपनी आहे. इलेक्ट्रॉनिक्समधील सुटे भाग, मायक्रोचिप्स आणि सेमीकंडक्टर यांचा बव्हंशी पुरवठा फॉक्सकॉन तर्फेच जगभर केला जातो. बहुचर्चित पल या कंपनीसाठी लागणारे मोबाइल फोनचे सुटे भाग किंवा संपूर्ण पल फोन यांचे उत्पादन फॉक्सकॉनच सांभाळते. वेदांत समुहाने फॉक्सकॉनशी भागिदारी करून सेमीकंडक्टर आणि अन्य सुट्या भागांच्या निर्मितीसाठी भारतात कारखाना उभारण्याचा महाप्रकल्प हाती घेतला आहे. तब्बल एक लाख ५४ हजार कोटी रूपये मूल्याचा हा प्रकल्प आहे. यामधून एक लाख रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजरात अशी काही अग्रेसर राज्ये हा प्रकल्प आपल्याकडे यावा यासाठी प्रयत्नशील होती. वेदांत समुह आणि फॉक्सकॉन यांच्याशी प्राथमिक बोलणी केंद्र सरकार तर्फेच करण्यात आली. हा महाप्रकल्प भारतात येण्याचे सर्वात मोठे श्रेय कोणाचे असेल तर ते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना द्यावे लागेल. भारतात इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर प्रचंड प्रमाणात होत असला तरी या वस्तूंचे उत्पादन किंवा सुट्या भागांची निर्मिती देशात होत नव्हती. इलेक्ट्रॉनिक्सशी संबंधित सर्वच घटक आयात करावे लागत असत. भारतात मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. या मनुष्यबळाचा योग्य वापर होण्याची गरज पंतप्रधान मोदी यांनी पहिल्यांदा ओळखली आणि मेक इन इंडिया हा उपक्रम सुरू केला. इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे सुटे भाग आणि विशेषत: सेमीकंडक्टर भारतात बनू लागले तर थायलंड, फिलिपाइन्स, तैवान या देशांप्रमाणेच अल्पावधीत जम बसवता येईल हे धोरण ठेवून परदेशी गुंतवणूक वाढवण्यावर पंतप्रधान मोदी यांनी भर दिला. जगाला ग्रासणाऱ्या भीषण कोरोना काळातही त्यांचे हे प्रयत्न सुरूच राहिले. या प्रयत्नांची मधुर फळे आता कुठे दिसू लागली आहेत. वेदांत–फॉक्सकॉनचा संयुक्त प्रकल्प हे त्याच प्रयत्नांचे फलित. वेदांत समुहाने यापूर्वी स्टरलाइट या महाबलाढ्य कंपनीसोबत तामिळनाडूमध्ये प्रक्रिया केलेल्या तांब्याच्या निर्मितीचा कारखाना सुरू केला होता. काही कारणाने तो बंद पडला. त्यामुळे झालेले नुकसान भरून निघावे यासाठी तामिळनाडू सरकारने वेदांत–फॉक्सकॉन महाप्रकल्पाला लाल गालिचाचे निमंत्रण देऊ केले होते. कर्नाटक सरकारने देखील भरघोस सवलती देऊ केल्या होत्या. महाराष्ट्राने तळेगावजवळ एक हजार एकर जमीन सवलतीच्या दरात देऊ केली होती. परंतु गुजरातने तेवढीच जमीन मोफत दिलीच, शिवाय सवलतीच्या दरात वीज व पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. हा प्रकल्प महाराष्ट्रात उभा राहणार होता अशी ओरड महाविकास आघाडीचे काही नेते आता करत आहेत. ती हास्यास्पद आहे. हा प्रकल्प गुजरातला का गेला याचे आत्मपरीक्षण मात्र राज्य सरकारला करावेच लागेल. इलेक्ट्रॉनिक चिपची आयात करणारा भारत येत्या दोन वर्षांत इलेक्ट्रॉनिकच्या सुट्या भागांचा प्रमुख निर्यातदार होईल ही बाब निश्चितच अभिमानाची आणि आनंदाची आहे.**

# दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र मंत्रालय हवे!




**खबरबात**
**नितीन देशमुख**

महाराष्ट्र शासनाने तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग व्यक्तींसाठी महाराष्ट्र राज्य धोरण २०१८ जाहीर केले. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी, दिव्यांगांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय, स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी नेमणे आवश्यक आहे. यामुळे वेगवेगळ्या कार्यालयांत जाण्यासाठी दिव्यांगांची ससेहोलपट टळणार आहे. याबरोबरच खोटे अपंग दाखले देणाऱ्यांवर कठोर कारवाई केल्यास निधीचा अपव्यय टळेल.

२००१च्या जनगणनेनुसार राज्यात १५ लाख ६९ हजार ५८२ दिव्यांग आहेत. त्यात सहा लाख ३५ हजार ७१५ स्त्रिया, तर नऊ लाख ३३ हजार ८३७ पुरुष आहेत. २०११च्या जनगणनेनंतर या आकडेवारीत निश्चितच वाढ झाली आहे, पण ती सरकार दरबारी उपलब्ध होत नाही. एवढ्या मोठ्या संख्येने असणाऱ्या दिव्यांगांच्या समस्यांना न्याय देण्यासाठी आणि माणूस म्हणून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय असावे, अशी अपंगांची मागणी आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दिव्यांगांना देण्यात येणारा दिव्यांगांचा दाखला कम्प्युटराइज्ड असावा. हा दाखला मिळवण्यासाठी राज्यातील प्रत्येक दिव्यांगाला त्याच्या जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. काही दिव्यांगांचे व्यंग गंभीर असते. त्यांच्यासाठी हा प्रवास सुसह्य नसतो यासाठी त्यांना एका फेरीत दाखला मिळावा. दिव्यांगांसाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या अनेक योजना असून त्यांच्यासाठी कायदाही करण्यात आला आहे. १९९५, १९९९ आणि २००६मध्ये दिव्यांगांसाठी कायदे करण्यात आले आहेत. सरकारी क्षेत्रात तीन टक्के आणि खासगी क्षेत्रातही दिव्यांगांना काही जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे.

केंद्र सरकारबरोबरच तामिळनाडू, केरळ, गोवा, गुजरात, छत्तीसगड आणि राजस्थान या राज्यांनी दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी धोरण आखले आहे. हे धोरण महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे. सरकारी पातळीवर तीन टक्के जागा भरल्या जातात, परंतु त्यात सुलभता अपेक्षित आहे. खासगी क्षेत्रात दिव्यांगांच्या नोकरीबाबत अनास्थाच दिसते. अपंग वित्त विकास महामंडळ कोणाला कर्ज देते आणि त्यांचा कारभार काय आहे? या मंडळाच्या कारभारावर वचक हवा, अशी मागणी आहे.

महाराष्ट्र राज्यात दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र अपंग कल्याण आयुक्त पदाची निर्मिती केली. योजना राबविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने आपल्या उत्पन्नातील पाच टक्के आपल्या भागातील दिव्यांगांसाठी खर्च करावयाचे आहेत. त्याची जबाबदारी स्वतंत्र कर्मचाऱ्यांवर न देता ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकावर दिली आहे. ग्रामपंचायती उत्पन्न कमी असल्यास पंचायत समिती व नंतर जिल्हा परिषदेच्या समजा कल्याण विभागाची जबाबदारी असणार आहे. याशिवाय संजय गांधी निराधार योजनेतून मदत मिळते पण दिव्यांग व्यक्तिला कार्यालयाच्या फेऱ्या मारायला लावण्यापेक्षा स्वतंत्र विभाग निर्माण केल्यास त्यांना एकाच ठिकाणी माहिती व सुविधा मिळेल. दिव्यांगांचे दिव्यांग अधिकार अधिनियम २०१६ नुसार २१ प्रकार आहेत. आपल्या देशात तीन टक्के दिव्यांग असल्याचे संगितले जाते पण जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालाप्रमाणे ८ ते १० टक्के आहेत.

रायगड जिल्ह्यात २०१० च्या जनगणनेनुसार ५९,३०१ अपंग आहेत. अपंग प्रतिबंधांनासाठी पूर्व हस्तक्षेप हा अंध, कर्णबधिर, मतिमंद व स्वयममग्न असलेल्या ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी राबविण्यात येतो. आयुक्तालयामार्फत कर्णबधीर मुलांच्या शिक्षणासाठी व प्रशिक्षणासाठी दरवर्षी प्रती विद्यार्थी १.७५ लक्ष रक्कम खर्च होते. यामध्ये सहाय्यक उपकरणाचाही समावेश आहे. आपल्या समाजात दिव्यांग मुलांचे प्रमाण २० टक्के असल्याचा जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल आहे. दिव्यांग मुले हा अपंगत्वचाच एक प्रकार आहे. पालक ते समाजापासून लपवून ठेवतात. त्यामुळे वेळेवर उपचार होत नाहीत. त्याचा परिणाम ही मुले समाजाच्या मुख्य प्रवाहत येत नाहीत आणि मोठी झाल्यावर पालकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. पूर्व हस्तक्षेपामुळे काही व्यंग संपूर्णपणे दूर होऊ शकतात तर काहींची तीव्रता कमी होते. यामध्ये दिव्यांग बालकात निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी शक्य तितक्या लवकर करावयाच्या कृतीचा समावेश आहे. त्यामुळे दिव्यांग बालकाची वाटचाल सामान्य बालकाकडे होऊ शकते. मूलभूत कौशल्ये जसे शारीरिक, मानसिक, संभाषण, सामाजिक, भावनिक व स्वयंसहाय्यता शिकावीत याकडे लक्ष दिले जाते.

पूर्व हस्तक्षेप यामुळे पालक व कुटुंबियांवरील दिव्यांग बालकांमुळे निर्माण झालेला तणाव कमी होतो व त्यांचे पुनर्वसन ही होईल. दिव्यांगाना रोजगार मिळावा म्हणून साहित्य खरेदीवर जास्तीत जास्त निधी खर्च करण्यापेक्षा त्यांच्या उपचारसाठी जास्त निधी खर्च केला तर त्यांची संख्या कमी होण्यासाठी मदत होईल. अशा मुलांना संजय दातार यांच्या सारख्या व्यक्ती दातार संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या प्रवाहात आणण्याचे काम करून समाजापुढे एक आदर्श ठेवत आहेत.

रायगड जिल्ह्यात १६ दिव्यांगांच्या शाळा व दोन कार्यशाळा आहेत. या शाळा चालविण्याचा खर्च परवडणारा नसल्याने शासनाने कायम विनाअनुदानित शब्द काढावा अशी मागणी या संस्था करीत आहेत. शहरे वसविताना विकासकांनी दिव्यांगाचा विचार करून इमारती व उद्याने बनविली पाहिजेत. राज्यातील दिव्यांगासाठी शासन निधी देत असते. पण दिव्यांगांचा विकास महत्त्वाचा असताना तो निधी खर्च केला जात नाही, त्यामुळे पडून राहतो असे तत्कालीन अपंग कल्याण आयुक्त नितिन पाटील यांनी पनवेल येथे आयोजित अपंग कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले होते. दिव्यांगांसाठी आयुक्त अपंग कल्याण यांचेकडून अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग व मतिमंद प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शाळांत पूर्व व शालांतोत्तर शिष्यवृत्ती, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बिजभांडवल, कृत्रिम अवयव व साधने पुरविणे, व्यवसायासाठी अर्थसहाय्य दिले जाते, मार्गदर्शन व सल्ला केंद्रे चालविली जातात. दिव्यांग व अव्यंग विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी अशा जोडप्याला ५० हजार रुपये दिले जातात. क्रीडा स्पर्धा, गुणवत्ता पुरस्कार, राज्य पुरस्कार दिले जातात व केंद्र पुरस्कृत योजनाही राबविण्यात येत आहे.

शासनाने दिव्यांगांना सवलती दिल्याने त्याचा गैरफायदा अनेक जण घेत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी खोटे अपंगाचे दाखले घेण्यात आलेले आहेत आणि याच व्यक्तींना सगळ्या सवलती मिळत असल्याचे दिसून येत आहे. खरे दिव्यांग या सवलतींपासून वंचित आहेत. एस टीमध्ये धावत येऊन गाडी पकडणार दिव्यांग पायाने अपंग असतो. एका कार्यालयत दिव्यांग म्हणून सवलत घेणारी व्यक्ती कार्यालयात कुबड्या घेऊन यायचा नंतर पुढे जाऊन तो दुचाकीवर पत्नीला घेऊन जात असल्याचा प्रकार उघडकीस आला. अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

सारासार विचार करता अपंगाचे खोटे दाखले देणाऱ्यांवर कडक कारवाई करणे गरजेचे आहे. एस.टी. महामंडळानेही आपले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून नवीन संगणकीय ओळखपत्र देण्यात येणार आहेत त्याचा आग्रह धरणे गरजेचे आहे. दिव्यांगांच्या टक्केवारीप्रमाणे ही ओळखपत्र वेगवेगळ्या रंगाची असून त्याच्यावर सिव्हील सर्जन व अस्थिरोग तज्ञाची स्वाक्षरी असेल. यामुळे खोट्या ओळखपत्रांना आळा बसेल. आता देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले आहेत, त्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगून दिव्यांगांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वतंत्र मंत्रालय व अधिकारी नेमले तरच दिव्यांगांना न्याय मिळेल. दिव्यांगांना सर्वच स्तरावर न्याय मिळावा अशी रास्त अपेक्षा समाजातील दिव्यांगांची आहे. दिव्यांगही समाजाचा एक घटक आहेत आणि त्यांना न्याय हा मिळालाच पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाइलमध्ये लहान होल का असतो? जाणून घ्या महत्त्व

बहुतांश स्मार्टफोनच्या खालच्या बाजूला एक लहान होल असतो, बऱ्याच वेळा तो फोनच्या डिझाईनचा एक भाग असेल असे गृहीत धरून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आजकाल प्रत्येकाच्या हातात एक गोष्ट कायम असते ती म्हणजे स्मार्टफोन. प्रवास असो किंवा कामातून काढलेला ब्रेक प्रत्येक जण सतत स्मार्टफोनमध्ये व्यग्र असतो. यामागचे कारणही तसेच आहे.



स्मार्टफोनमुळे दैनंदिन जीवनातील बऱ्याच गोष्टी सहजरित्या एका क्लिकवर करता येतात. त्यामुळे प्रत्येक काम करण्यासाठी आपण स्मार्टफोनचा आधार घेतो. पण दिवसातला बराच वेळ आपण ज्या फोनवर घालवतो त्यातील काही फीचर्स किंवा त्यावर असणाऱ्या विविध टॅब्सचा वापर कशासाठी होतो हे बऱ्याच वेळा माहीत नसते. यातीलच एक गोष्ट म्हणजे बहुतांश स्मार्टफोनच्या खालच्या बाजुला असणारा लहान होल होय.

बहुतांश स्मार्टफोनच्या खालच्या बाजुला चार्जिंग कनेक्शन जोडण्याच्या शेजारी एक लहान होल असतो. बऱ्याच वेळा तो फोनच्या डिझाईनचा एक भाग असेल असे गृहीत धरून, त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण हा लहान होल फोनच्या डिझाईनचा भाग नसून एका महत्त्वाच्या कारणासाठी त्या जागी असतो. आपण जेव्हा फोनवर बोलत असतो तेव्हा हा लहान होल महत्त्वाची भूमिका बजावत असतो. हा होल आपण फोनवर बोलत असताना आपल्या आजुबाजूला असणारा आवाज कॅन्सल करण्याचे काम करतो. म्हणजे जेव्हा आपण फोनवर बोलतो तेव्हा आपल्या आवाजासोबत आजुबाजूचा आवाजदेखील समोरच्या व्यक्तीला ऐकू जाण्याची शक्यता असते. पण या लहान होलमुळे आपल्या व्यतिरिक्त दुसरा आवाज पोहचत नाही.

या होलला 'नॉइस कॅन्सलेशन माइक्रोफोन' म्हटले जाते. फोनवर बोलत असताना हे ऑटोमॅटिक ॲक्टिव्ह होते. तुम्ही खूप गोंधळ असलेल्या ठिकाणी जरी असला तरी या नॉइस कॅन्सलेशन माइक्रोफोनमुळे आजूबाजूचा आवाज कॅन्सल होऊन फक्त तुमचा आवाज समोरच्या व्यक्तीपर्यंत क्लिअर पोहोचण्यास मदत होते. दरम्यान, अलिकडच्या काळात स्मार्टफोनचा वापर वाढला आहे. मात्र यातील टेक्नीकल बाबी बऱ्याच जणांना माहितही नसतात. या मुळे ही माहिती देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

# प्रतिभासंपन्न कवी प्रा. सदानंद रेगे



प्रा. सदानंद रेगे हे कवी, कथाकार आणि अनुवादक म्हणून मराठी साहित्यविश्वात ओळखले जातात. त्यांचा जन्म २१ जून १९२३ रोजी राजापूर येथे आजोळी झाला. १९४०मध्ये मुंबईतील छबिलदास हायस्कूलमधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. चित्रकलेच्या शिक्षणासाठी ते जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल झाले, पण खडतर परिस्थितीमुळे त्यांच्या या शिक्षणात खंड पडला. सुरुवातीला त्यांनी किरकोळ नोकऱ्या केल्या. पश्चिम रेल्वेमध्ये ते १८ वर्षे कार्यरत होते. मॅट्रिकनंतर १८ वर्षांनी त्यांनी बीएची आणि नंतर एमएची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी २१ वर्षे इंग्रजीचे अध्यापन केले.

प्रा. रेगे यांनी आपल्या लेखनाची सुरुवात कवितेपासून केली. त्यांची पहिली कविता १९४८मध्ये 'अभिरूची' या वाङ्मयीन नियतकालिकात प्रसिद्ध झाली. नवकवितेच्या परंपरेतील कवी म्हणून ते ओळखले जातात. त्यांचा १९५०मध्ये 'अक्षरवेल' हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्यांचे 'गंधर्व' (१९६०), 'देवापुढचा दिवा' (१९६५), 'ब्राँकुशीचा पक्षी' (१९८०) आणि 'वेड्या कविता' (१९८०) हे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. प्रा. रेगे यांनी सातत्याने लक्षणीय स्वरूपाचे कथालेखन केले. त्यात त्यांनी अनेक प्रयोग केले. विश्वसाहित्यातील उत्तमोत्तम नाटकांचा आणि कवितासंग्रहांचा अनुवाद केला. बालसाहित्यात त्यांनी लक्षणीय स्वरूपाची भर घातली. आपला अपुरा राहिलेला चित्रकलेचा छंद त्यांनी पुढेही जोपासला.

प्रा.रेगे यांची 'अक्षरवेल' ही कविता त्यांच्या कवितेविषयीच्या धारणा व्यक्त करणारी आहे. कविता ही आत्मनिष्ठ मनाची अभिव्यक्ती. तिच्यातून कवीच बोलत असतो. 'तुका म्हणे होय मनासी संवाद, आपुलाचि वाद आपणांसी' या उक्तीप्रमाणे तिचे मूलप्रेरणास्थान असते हे खरे, पण ते तेवढ्यापुरते मर्यादित राहत नाही. आत्मसंवादाची सीमारेषा ओलांडून ती जनसंवाद साधते. इतरांच्या अनुभूतींचा समवाय तिच्यात असल्यामुळे ती त्यांनाही आपली वाटते. पण प्रत्येकाच्या अक्षरवेलीचा आत्मा निराळा असतोच. कारण आयुष्याचा मर्मबंध तिच्यातून कवीने जोपासलेला असतो. नेमकी हीच कोवळीक सदानंद रेगे यांच्या 'अक्षरवेल'मध्ये आढळते. ही अक्षरवेल निसर्गानुभूतीच्या साहचर्याने बहरत गेली आहे. कवी म्हणतात, माझ्या अक्षरवेलीला नभाचा आधार आहे. तिच्या प्रत्येक फांदीवर गीतांचा झुबका डुलत आहे. काव्य आणि गीत एकात्म असतात. या स्वरलयीतून कवीचे स्पंदन प्रकट होते असे त्याला सुचवायचे आहे. चांदण्याची नितांत रमणीयता आणि सागरलाटांचे नर्तन एकत्रित आले तर त्यावेळची भावावस्था अनोखी असते. काव्यनिर्मितीच्या वेळी कवी ही संपृक्तावस्था अनुभवत असतो. तिला शब्दरूप देताना कवी म्हणतात. माझ्या अक्षरवेलींचे मन चांदण्यावरती, तिला लाटा सागराच्या खुणावती बोलावती, माझ्या अक्षरवेलीला पोपटपंखांची पाने आहेत. तिला चंद्र, सूर्य आणि अन्य आकाशगोलांची फळेफुले लगडलेली आहेत असे कवी म्हणतात. 'पोपटपंखांची पाने' या प्रतिमेतून कवीला या पोपटी लालस पालवीमधून कवितेचे उन्मेषशाली स्वरूप सुचवायचे आहे. चंद्र, सूर्य आणि आकाशगोलांच्या स्पर्शामुळे तिला अपार्थिवता प्राप्त झाली आहे असे कवीला वाटते. माझ्या अक्षरवेलीला क्षितिजाच्या रेषेची नित्य भुलावण असते. इथेही पार्थिवता आणि अपार्थिवता यांची सीमारेषा कवीला अभिप्रेत आहे. प्रा. रेगेंचे निधन २१ सप्टेंबर १९८२ रोजी झाले.

**–डॉ. सोमनाथ कोमरपंत**

**क्लिक...क्लिक...!**




**मुरूड : प्रसिद्ध ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यात करण्यात आला आहे. यामुळे व्यावसायिकांनाही रोजगार सुरु झाला आहे. त्या दृष्टीने व्यावसायिक हे पर्यटकांच्या सेवेत सज्ज झाले आहेत.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# ग्रीन टीमध्ये 'या' पदार्थांचा समावेश करा

ग्रीन टी हे एक 'आरोग्यदायी पेय' म्हणून प्रसिद्ध आहे. तुमच्या संपूर्ण शरीराच्या स्वास्थासाठी ग्रीन टी फायदेशीरच ठरते. त्याचे फायदे वाढविण्यासाठी आणखी दोन गोष्टी त्यात टाकता येतील. आजकाल वजन कमी करण्यासाठी 'मसाला चहा' ऐवजी 'ग्रीन टी' घेण्याला प्राधान्य दिले जाते. ग्रीन टी हे एक 'आरोग्यदायी पेय' म्हणूनदेखील प्रसिद्ध आहे.



चहापेक्षा ग्रीन टीमध्ये अँटिऑक्सिडंट जास्त प्रमाणात असतात. ग्रीन टीमधील फायटोकेमिकल्स, पॉलिफेनॉल, इन्झायमी आणि अमिनो ॲसिड तुमच्या मनाला निवांत करतात. ग्रीन टीमुळे तुमची त्वचा नितळ होते, चयापचयाचे कार्य सुधारते. ग्रीन टीमुळे केवळ तुमचे मनच शांत हाते असे नाही तर तुमच्या संपूर्ण शरीराच्या स्वास्थासाठी ग्रीन टी फायदेशीरच ठरते. त्याचे फायदे वाढवण्यासाठी आणखी दोन गोष्टी त्यात टाकता येतील. जाणून घेऊया कोणत्या आहेत, या दोन गोष्टी. तसेच चहा प्रेमींनी ग्रीन टीकडे चहाचा पर्याय म्हणून न पाहता आरोग्यदायी पेय म्हणून बघावे. जर तुम्ही ग्रीन टी फक्त पाण्यात उकळून प्यायले तर तुम्ही त्यात आले आणि दालचिनी या दोन गोष्टी टाकू शकता, ज्यामुळे त्याचे फायदे वाढतील. त्यानुसार एका पातेल्यात पाणी घेऊन त्यात दालचिनी पावडर किंवा दालचिनीचा छोटा तुकडा घाला. या पाण्यात दोन्ही गोष्टींचा अर्क येईपर्यंत उकळवा. आता एका कपमध्ये ग्रीन टीची पाने टाका आणि हे पाणी वरून टाका. पाण्याचा रंग बदलेपर्यंत ५ मिनिटे असेच राहू द्या. आता हा चहा गाळून प्या. त्यात गोडवा आणायचा असेल तर तुम्ही त्यात मधही घालू शकता. मात्र प्रत्येकाने ते चवीनुसार ठरवावे.

आले आणि दालचिनी घालण्याचे फायदे बरेच आहेत. दालचिनी आणि आले या दोन्हीमध्ये अँटी इंफ्लामेटरी गुणधर्म आहेत आणि ते अँटी ऑक्सिडंट्सने समृद्ध आहेत. दालचिनीमुळे हृदयविकाराचा धोकाही कमी होतो. याचा मधुमेहविरोधी प्रभावदेखील आहे. इतकेच नाही तर अनेक बॅक्टेरियल इन्फेक्शनमध्ये हे फायदेशीर मानले जाते. तसेच काही अभ्यासांतून त्याचे कर्करोगविरोधी गुणधर्म दिसून आले आहेत. हे परिणाम चाचणी ट्यूब आणि प्राण्यांच्या अभ्यासावर आधारित आहेत. दरम्यान, येथे देण्यात आलेली माहिती गृहीतके आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक माहितीकरिता आपल्या आरोग्य तज्ञांचा सल्ला घ्यावा असे सूचविण्यात येत आहे.

# रोह्यात गणेशोत्सवानंतर पावसाचा जोर


(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

दहा दिवसांच्या गणपती विसर्जननंतर रोहा तालुक्यात पावसाने सुरुवात केली आहे. सुरूवातील रिमझीम असलेल्या पावसाने सोमवारी रात्रीपासून जोरदार कोसळण्यास सुरुवात केली. मंगळवारीही पावसाचा जोर कायम होता. हवामान खात्याचा अंदाज खरा ठरवत रोह्यात गेले दोन दिवस जोरदार पाऊस पडत आहे.

दोन दिवस पडत असलेल्या पावसामुळे सखल भागात पाणी साचल्याचे दिसून आले. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, साखरचौथ गणेशोत्सव सुरू असताना पावसाची हजेरी लागल्याने भाविकांना घराबाहेर पडता येत नव्हते. मंगळवारी दिवसभर पाऊसमय वातावरण होते. सकाळी शाळेत जाताना मुलांची व कामावर जाणाऱ्या कामगारांची तारंबळ उडाली होती. मंगळवारी दुपारी पावसाचा जोर कमी झाला असला तरी रिमझीम पाऊस पडतच होता. मध्येच मोठी सर येवून जात होती. सायंकाळी पुन्हा पावसाने जोर धरल्याने बाजारात शुकशूकाट होता.

# अलिबागमध्ये वाहतूक कोंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**



शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत आहे. एसटी डेपोसमोर तर कायमच वाहतूक कोंडी होत असते. त्याचप्रमाणे ब्राह्मण आळीतील दत्तमंदिरा समोरील वळणारदेखील वाहतूक कोंडी पहायला मिळते.

अलिबाग शहरातील पूर्वीच्या अरुंद रस्त्याचे आता बऱ्यापैकी रुंदीकरण झाले आहे. त्याबरोबरच वाहनांची संख्यादेखील वाढली आहे. दुचाकी, चारचाकी वाहने आणि अवजड वाहनेदेखील रुंद-अरुंद रस्त्यावरून धावत असतात. ब्राह्मण आळी येथील दत्त मंदिराच्या समोरील वळणावर कायमच वाहतूक कोंडी होत असल्याचे पहायला मिळते. एकतर हे वळण घातक आहे. समोरून येणारे वाहन दिसत नाही. त्यात रस्त्या कडेला वाहने उभी करून वाहन चालक चहा, नास्ता करण्यासाठी जातात. बऱ्याच वेळा चालक बेशिस्तपणे वाहन उभे करून जातात. परिणामी समोरून, मागून येणाऱ्या अन्य वाहनांना अडथळा होतो.

मंगळवारी दुपारी या वळणावर एका कारला टेम्पो घासला. मोठा अपघात घडला नाही, पण केवळ वळणार उभ्या असलेल्या अन्य वाहनांमुळे ही घटना घडली. विशेष म्हणजे येथे वारंवार अशा घटना घडत असतात. काही धूम स्टाईल दुचाकीस्वारांना अपघातही झाले आहेत. त्यामुळे एकतर या वळणार गतिरोधक असावा किंवा बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावावी, अशी मागणी होत आहे.

# ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या सर्व्हेच्या सनद वाटपास खालापूर तालुक्यातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**





जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाचे अधीक्षक सचिन इंगळी यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्यात ड्रोनद्वारे झालेल्या गावठाण भूमापन सर्व्हेच्या सनद वाटप कार्यक्रमास तालुक्यातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

केंद्र शासनाच्या स्वामित्व योजनेंतर्गत महाराष्ट्रातील सर्व गावाचे गावठाण सर्वेक्षण करण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य शासनाच्या ग्रामविकास खात्यांतर्गत घेण्यात आला. त्यानुसार भूमी अभिलेख विभागाच्या पुढाकाराने महसूल विभाग व ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खालापूर तालुक्यातील एकूण १५३ गावे व वाड्यांपैकी गावठाण भूमापन न झालेले १०३ गावांची अत्याधुनिक ड्रोनद्वारे भारतीय सर्वेक्षण विभागामार्फत अत्यंत अचूक पद्धतीने मोजणी करण्यात आली.

भारतीय सर्वेक्षण विभागाकडून मोजणी नकाशे मिळाल्यानंतर भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशी करून संपूर्ण अभिलेख डिजिटाईज करून घेतात. त्यानंतर सर्व्हे ऑफ इंडिया मार्फत भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे गावठाणातील प्रत्येक मिळकतीची सनद मिळकत पत्रिका व नकाशा तयार केले जातात. अशा पद्धतीने खालापूर येथे १०३ गावांचे ड्रोन सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून, ४५ गावांचे प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशीचे कामदेखील पूर्ण झाले आहे. त्यापैकी ३८ गावांच्या मिळकत पत्रिका आणि १३ गावांच्या सनद तयार झाल्या आहेत.

खालापूर तालुक्यातील विणेगाव, इसांबे, तोंडली, ढेकू, वारद, कुंभिवली या गावांचा सनद वितरण कार्यक्रम ७ सप्टेंबर रोजी आणि सारसन, लोहोप, स्वाली, पौद, केळवली या गावांच्या सनद वितरण करण्याचा कार्यक्रम ८ सप्टेंबर रोजी संबंधीत ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आला. यावेळी संबंधित गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसेवक यांनी उत्तम सहकार्य केले. या वेळी सरासरी ८२ टक्के वसूली झाली आहे. संबंधित मिळकतधारकांकडून सनद घेण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळाला. प्रत्येकाला आपल्या मालकी हक्काचा पुरावा व अभिलेख मिळाल्यामुळे जनतेने समाधान व्यक्त केले आहे.

कोकण प्रदेश भूमी अभिलेखचे उपसंचालक जयंत निकम आणि रायगड जिल्हा अधीक्षक सचिन इंगळी यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर भूमी अभिलेख उपअधीक्षक शरद काळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अचूक नियोजन करून ही मोहीम यशस्वी केली.

# रायगड जिल्हा परिषदेचा कारभार होतोय हायटेक

## घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीसाठी डिजिटल कर प्रणाली कार्यान्वित

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचा कारभार हायटेक होत असून जिल्हा परिषदेने डिजिटल कर प्रणाली कार्यान्वित केली आहे. यामुळे ग्रामपंचायतींना घरपट्टी तसेच पाणीपट्टी वसुली करणे तसेच त्याची नोंद ठेवणे सुलभ झाले आहे. ही प्रणाली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून ग्रामपंचायत विभागाच्या माध्यमातून साकारण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ग्रामीण भागात घरपट्टी तसेच पाणीपट्टी वसुली करण्यात येते. या कर वसुलीत सुसूत्रता यावी, त्याची एकत्रित नोंद राहावी तसेच करदात्यांना ऑनलाइन पद्धतीने घरपट्टी तसेच पाणीपट्टीचा भरणा करता यावा, या उद्देशाने डिजिटल कर प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे ग्रामपंचायतींना एका क्लिकवर संपूर्ण करदात्यांची माहिती उपलब्ध होणार आहे. किती घरपट्टी व पाणीपट्टी वसुली झाली, किती वसुली होणे बाकी आहे ही माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. यामुळे ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

डिजिटल कर प्रणाली तयार केल्यानंतर या प्रणालीचा चाचणी करण्यात आली. यामध्ये आढळलेल्या उणीव दूर करून, ही प्रणाली जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना देण्यात आली आहे. प्रणालीत ग्रामपंचायत निहाय करदात्यांची माहिती भरण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाने दिली आहे.

# रायगडात ठिकठिकाणी साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना



**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाची सांगता झाल्यानंतर मंगळवारी (दि. १३) पहिल्या संकष्टी चतुर्थीला पेण तालुक्यात ठिकठिकाणी सार्वजनिक आणि घरगुती साखरचौथ गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

पेणमध्ये मोठ्या उत्साहात साखरचौथ गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून मंगळवारी सकाळी मिरवणुकीने सारखचौथ गणपतीचे आगमन होऊन विधीपूर्वक श्रींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे मंडळातर्फे आयोजन करण्यात आले असून सर्वत्र मंगलमय असे पवित्र वातावातावरण निर्माण झाले आहे.

पेण शहरात अष्टविनायक मित्रमंडळ, ओरिजनल अष्टविनायक मित्रमंडळ, प्रेमनगर मित्रमंडळ-चिंचपाडा, कवंडाळ तळ्याचा राजा, मातोश्री मित्र मंडळ, सुंदरनगर मित्रमंडळ, साई माऊली गणेशोत्सव मंडळ-नरदास चाळ, श्री गणेश उत्सव मंडळ-कोळीवाडा, महाकाली मित्रमंडळ-कासारआळी, शिक्षक सोसायटी मित्रमंडळ, चिंतामणी विश्वराज-पिंपळपाडा, जय गणेश मित्रमंडळ -बोरगाव, श्री मित्रमंडळ, न्यु यंग गणेश मंडळ, मित्रमंडळ -दामुगुडे आळी, ओम श्री मित्रमंडळ -विठ्ठल आळी, शिवसमर्थ मित्रमंडळ-आबेघर, अष्टविनायक मित्रमंडळ -गणपतीची वाडी, यंगस्टार शिवसमर्थ मित्रमंडळ -आंबेघर, अष्टविनायक मित्रमंडळ-गणपतीचीवाडी, यंगस्टार मित्रमंडळ-रामवाडी, साखरचौथ ग्रामस्थ मंडळ-इरवाडी आदी ठिकाणी सार्वजनिक मंडळासह तालुक्यात घरगुती सारखचौथ गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. त्यामध्ये पेण पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ५८ सार्वजनिक व ८२ घरगुती साखरचौथ गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

या गणेशोत्सवानिमित्त सर्वत्र भव्य मंडपे उभारण्यात आली असून विद्युत रोषणाईसह मनमोहक अशी सजावट करण्यात आली आहे. गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची सर्वत्र रिघ लागल्याचे पहावयास मिळत आहे. सदर गणेशोत्सव शांततेने तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करुन साजरा करण्याचे आवाहन पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी केले आहे.

**मुरूड : प्रतिनिधी**

यशवंतनगर नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन हायस्कूलमध्ये मंगळवारी (दि. १३) पंचक्रोशीच्या राजाचे आगमन झाले. विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक परंपरा जागृत ठेवण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही हायस्कूलमध्ये साखरचौथ गणपती आणला आहे.

साखरचौथ गणपती पंचक्रोशीच्या राजाच्या पूजेचा मान हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक चिंतामणी जोशी यांना मिळाला. शैलेश जोशी पौराहित्य केले. या वेळी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी महाआरती केली.

या साखरचौथ गणपतीची सजावट प्रतीक पेडणेकर, अमर दरणे व संतोष बुल्लू यांनी केले आहे. तर मूर्तिकार जितेंद्र चोरघे आहेत. गणरायासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास रेखाटण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका, अफजल खानाचा वध, पावन खिंडीमधील लढाई, महाराजांचे समुद्री आरमार, जिजाऊ यांच्याकडून मिळालेली तलवार भेट हे सर्व प्रसंग चित्रांच्या माध्यमातून दाखवण्यात आले आहे.




**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात साखरचौथचे २२ सार्वजनिक आणि ७४ खाजगी गणराय मंगळवारी विराजमान झाले आहेत.



रोहा तालुक्यातील भुवनेश्वर येथील श्रीकृष्ण नगर, रोहा शहरातील धनगर आळी, अंधार आळी, वरसेसह अन्य ठिकाणी मंगळवारी साखरचौथ गणरायाचे वाजत गाजत आगमन झाले. तर तालुक्यात घरोघरी गणपती विराजमान झाले आहेत. सार्वजनिक मंडळांच्या वतीने रात्रभर भजन, किर्तन, विविध आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक मंडळांचे २२ तर ७४ खाजगी गणराय विराजमान झाले आहेत. रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**रेवदंडा : प्रतिनिधी**



रेवदंडा मित्रमंडळाच्या साखरचौथ श्री गणेशाची मंगळवारी (दि. १३) सकाळी साडेआठ वाजता थाटात प्रतिष्ठापना करण्यात आली.

येथील भैरवनाथ मंदिराच्या प्रांगणात दरवर्षी रेवदंडा मित्रमंडळाच्या वतीने साखरचौथ गणेशोत्सव साजरा केला जातो. मंडळातर्फे सोमवारी (दि. १२) सायकांळी बागमळा ते रेवदंडा भैरवनाथ मंदिर अशी भव्य आगमन रॅली काढण्यात आली होती. मंगळवारी सकाळी श्रींच्या मुर्तीची प्रतिष्ठापना, पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर गणपती अथर्वशीर्ष आवर्तने, दुपारी महिला मंडळ नाच, सायकांळी संदिप केळकर व सहकारी यांचे सुगम गायनाचा कार्यक्रम झाला. रात्री सव्वानऊ वाजता आरती, त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.

# बाप्पाच्या दर्शनासाठी महडमध्ये भक्तांचा महापूर



**खोपोली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानंतर लगेच आलेल्या अंगारक योग निमित्ताने अष्टविनायक क्षेत्र महड येथे वरदविनायकाच्या दर्शनासाठी मंगळवारी (दि. १३) भक्तांनी गर्दी केली होती. पहाटे महाआरती झाल्यापासून लागलेल्या भाविकांच्या रांगा रात्री उशिरापर्यंत कायम राहिल्या.

अंगारकी चतुर्थीनिमित्त महड मंदिर सभामंडपात विविध फुले वापरून साकारलेली आकर्षक रांगोळी, फुलांची आरास व मन प्रसन्न होईल अशी सजावट करण्यात आली होती. बाप्पाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून श्री. क्षेत्र महड देवस्थान व्यवस्थापन कमिटीच्या कार्यवाह मोहिनी वैद्य व वरिष्ठ सदस्य केदार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापन कमिटी कार्यमग्न होती. खालापूर पोलीस व स्थानिक नागरिकांनी सोयी-सुविधा उपलब्ध केल्याचे दिसले. मंदिर व्यवस्थापक राजेंद्र बडगुजर यांची टीम सज्ज होती. दरम्यान, खोपोलीतील शांतीनगर येथील ओझा गणपती मंदिर, काटरंग येथील सिद्धिविनायक मंदिर व खालापूर तालुक्यातील विविध गांवातील गणेश मंदिरातही अंगारकीनिमित्त भजन, आरती, महाप्रसाद असे विविध कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने झाले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-21/22-23/ Rfx No.7000024407 | Work of overhauling of 400/220 kV, 105 MVA, Spare ICT No 1 HV side (BHEL make) SF6 CB at 400 kV Nagothane s/s under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel. **2nd call** | **Rs. 4.70** | **20.09.2022 up to 23:59 hrs** |

**EMD Rs.** 5000/- & Tender fee Rs. 500/- + GST. For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



**TENDER NOTICE**

**Inspector, Rayat Shikshan Sanstha Raigad Region Kamothe is inviting** Sealed tenders from reputed / experienced contractors for the work mentioned below :

1. **Name of Work :** CONSTRUCTION OF PROFESSIONAL COLLEGE BUILDING ON PLOT No. 41, SEC. 11, KAMOTHE, NAVI MUMBAI.
2. **Estimated Cost :** Approximately Rs. 9,35,00,000/- (INCLUDING GST)
3. EMD : Rs. 10,00,000/- by D.D. of nationalized or Schedule bank in favor of **Inspector, Rayat Shikshan Sanstha Raigad Region**
4. **Cost of blank tender :** Rs.10,000/- (Rs. Ten Thousand only) (Non refundable)
5. **CRITERIA FOR ELIGIBILITY OF CONTRACTOR :**

1) The average turnover of the contractor for the last three years should not be less than Rs.15Crores.
2) The contractor should have completed 2 Government jobs of Rs. 8 Crores each in last three financial years **OR** 1 Government job of Rs. 10 Crores in last three financial years **OR** 2 Private jobs of Rs. 12 Crores each in last three financial years **OR** 1 Private job of Rs. 15 Crores in last three financial years.

6. **Place and Sale of Tender :** The Inspector, Rayat Shikshan Sanstha, Raigad Regional Office, Loknete Ramsheth Thakur English Medium School, Plot No. 40, Sec. 6-A, Kamothe, Tal. Panvel, Dist, Raigad. **Mob. 9821275159** from 15th Sept. 2022 to 29th Sept. 2022 from 11 AM to 5.30 PM excluding holidays.
7. **Pre Bid meeting :** 29th Sept. 2022 at 4.00 PM at above mentioned address.
8. **Date of Submission of Tender :** On or before 2.00 P.M. of 6.10.2022 at above mentioned address.
9. **Date of opening of Tender :** At 4.00 P.M. of 6.10.2022 at the same place.
10. **Completion Period :** 18 months including Monsoon.

**Architect**
N V Consultants
Rayat Shikshan Sanstha,

**Inspector**
Rayat Shikshan Sanstha,
Raigad Region Kamothe, Panvel

## निवडक

### सुदेशना पाटीलचे सुयश



**उरण** : जुलैमध्ये झालेल्या नीट युजी परीक्षेत गव्हाण कोपर येथील सुदेशना प्रल्हाद पाटील हिला ७२० पैकी ६९४ गुण प्राप्त होऊन संपूर्ण देशामध्ये ३६४वा क्रमांक मिळविला, तसेच ओबीसी गटात ७५वा क्रमांक पटकावला. या परीक्षेसाठी १८ लाख विद्यार्थी बसले होते. तिच्या या यशामध्ये तिचे आई मनीषा पाटील, वडील प्रल्हाद पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तिच्या या यशाबदल सर्वच स्तरातून तिचे कौतुक होत असून तिच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संपूर्ण तालुक्यातील नागरिकांसाठी ही अभिमानाची बाब असून मिळालेल्या यशाबद्दल पाटील परिवाराने आनंद व्यक्त केला आहे.

### पारगाव येथून डंपर पळविला

**पनवेल** : महिन्याच्या भाड्याने चालविण्यासाठी दिलेल्या डंपरचा परस्पर स्वतःच्या फायद्यासाठी डंपर मालकाचा विश्वासघात करून डंपरचा अपहार केल्याची घटना पनवेलजवळील पारगाव येथे घडली आहे. पारगाव येथे राहणारे विजय मेहेर यांच्या नावावर असेलला आठ लाखांचा डंपर (क्र. एमएच ४६ बीबी १०६८) भाड्याने चालविण्यासाठी एकास दिला असता त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी विजय मेहेर यांचा विश्वासघात करून पळविला. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सोन्याच्या दागिन्यांची पिशवी लंपास

**पनवेल** : घराचा दरवाजा उघडा ठेवल्याचा फायदा अज्ञात चोरट्याने घेऊन घरातील सोन्याच्या दागिन्यांची पिशवी चोरी केल्याची घटना शहरातील लक्ष्मी वसाहत येथे घडली आहे. माया लहाने यांच्या घराचा दरवाजा उघडा ठेवल्याचा फायदा अज्ञात चोरट्याने घेऊन घरातील सोन्याच्या दागिन्यांची पिशवी ज्यामध्ये जवळपास एक लाख साडेसहा हजार रुपये किमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने चोरून नेले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या


**पनवेल** : पनवेल शहरातील सिमरन मोटरच्या पाठीमागे असलेल्या कातकरवाडीत एका २० वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अक्षय अनंत कातकरी याने अज्ञात कारणावरून बदामाच्या झाडाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला. पनवेल पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# नवी मुंबई विज्ञान केंद्राच्या कामाला वेग

## जागतिक दर्जाच्या सुविधा; शहरासाठी ठरणार आयकॉन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरुळ येथील वंडर्स पार्कजवळच नवी मुंबई महापालिकेतर्फे १०९ कोटी खर्चून विज्ञान केंद्र साकारण्यात येत असून कामाला वेग आला आहे. या कामासाठी पावसाळा कालावधी वगळून १८ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. हा प्रकल्प नवी मुंबई शहरासाठी हा आयकॉन ठरणार आहे. या प्रकल्पाचे तळमजल्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.



सिडकोकडून विज्ञान केंद्रासाठीचा भूखंड वेगळा करून १ एफएसआयसह करारनामा झाला. त्यासाठी पालिकेने सिडकोला २४ कोटी १४ लाख रुपये भरणा केले. त्यामुळे मागील काही वर्षे प्रत्येक अर्थसंकल्पात कागदावर राहिलेला हा प्रकल्प आता प्रत्यक्षात साकारला जात आहे. शहरातील महत्त्वपूर्ण व नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू असलेल्या वंडर्स पार्कशेजारीच विज्ञान केंद्राची निर्मिती होणार असल्याने या विभागाला आणखीनच महत्व प्राप्त होणार आहे. नवी मुंबई शहरासाठी महत्त्वपूर्ण व शहराची नवी ओळख म्हणून ठरणाऱ्या या प्रकल्पाबाबत आयुक्त अभिजीत बांगर हे आग्रही असून महत्त्वपूर्ण व शहराचे आयकॉन ठरणारा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प पालिका आयुक्तांनी अर्थसंकल्पावेळी व्यक्त केला होता. मुंबई, बंगळूर व पिंपरी चिंचवड शहराप्रमाणेच नवी मुंबईत एक विज्ञान केंद्र निर्माण होणार आहे.


पालिकेने नेरुळ सेक्टर १९अ वंडर्स पार्कलगतच दहा हेक्टर भूखंडापैकी दोन हेक्टरचा भूखंड वेगळा करण्यात आला आहे. येथील संपूर्ण भूखंड चिल्ड्रेन पार्क म्हणून सिडकोने राखीव ठेवला होता. त्यातील काही भागावर वंडर्स पार्क उभारले असून शिल्लक असलेल्या दोन हेक्टर भूखंडावर पालिकेचे देखणे विज्ञान केंद्र आकारास येत आहे. अद्यावत व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भव्य विज्ञान केंद्र बनवण्यात येणार असून या केंद्रात जागतिक दर्जाच्या पायाभूत सोयीसुविधा दिल्या जाणार आहेत.

विज्ञान केंद्र आजच्या लहान मुलांसाठी आकर्षक तसेच रोजच्या व्यवहारात विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर काय आहे व भविष्यात याचा फायदा याची प्रचिती देणारे ठरावे यासाठी त्यामध्ये विविध विभाग करण्यात येणार असून पर्यावरण, जीवन, उर्जा, यंत्र व रोबोट, अंतराळ या घटकांचा त्याच्यात अंतर्भाव केला आहे. या केंद्राचे काम वेगात सुरू असून शहरातील नागरीकांना व युवापिढीला या केंद्राची उत्सुकता आहे.

> **नवी मुंबई शहरातील विज्ञान केंद्रामुळे शहराला वेगळे महत्त्व प्राप्त होणार असून शहरासाठी हा प्रकल्प आयकॉनिक ठरणार आहे. शहरासाठी हा प्रकल्प भूषणावह ठरेल यासाठी पालिका प्रयत्नशील आहे. या ठिकाणच्या प्रत्येक कामावर नियंत्रण असून काम वेगात सुरू आहे.**
>
> **–संजय देसाई, शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका**

# विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



कोपरखैरणे विभागात मागील काही दिवसांपासून वीजेचा लपंडाव सुरू आहे. मुसळधार पाऊस पडत असल्याने वारंवार वीज जात आहे. ऐनवेळी, दिवसभरात दोन ते तीन वेळा तासन्तास वीज गायब होत असून नागरिक हैराण झाले आहेत.

पावसाळा सुरु झाला की, केबलमध्ये बिघाड, कधी शॉर्ट सर्किट तर कधी ट्राम्सफार्मरला आग अशा घटना होत असतात. कोपरखैरणे विभागात भूमीगत असलेल्या वीजवाहिनी या जुन्याच आहेत. नागरी वस्तीही वाढल्याने या भागात विजेच्या मागणीत प्रचंड वाढ होत आहे. मागणी अधिक आणि पुरवठा पुरसा नसल्याने या भागात वीजपुरवठ्यावर ताण येत असून वारंवार वीज जाण्याच्या घटना घडत आहे. केबलमध्ये शॉर्टसर्किट, ट्राम्सफार्मरला आग आशा घटना वारंवार घडत असतात, पावसाळ्यात याचे प्रमाण अधिक वाढते. त्यामुळे ऐन पावसाळ्यात रस्ते, खोदकामे केली जातात.

कोपरखैरणे विभागात आधीच पदपथ नाहीसे झाले असून त्यात चिंचोळी रस्त्यावर पावसाळ्यात खोदकामाने रहिवासी त्रस्त झाले आहेत. महावितरणाने ही विजेची समस्या मार्गी लावावी, अशी मागणी होत आहे.

### खांदेश्वरमध्येही वीजपुरवठा खंडित

खांदेश्वर वसाहतीमधील सेक्टर ६ परिसरात रविवारी (दि. ११) रात्री दोन वाजल्यापासून सेक्टर ६ परिसरात अनेकांची वीज गायब झाली. वीजवाहिनी तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाल्याची माहिती कर्मचारी देत होते. सोमवारी सकाळी वीज येईल अशी अपेक्षा होती, मात्र दुपारी तीन वाजेपर्यंत १२ तास उलटले तरीही खांदेश्वर वसाहतीमधील अनेक भागात वीज परतली नसल्याने वीजग्राहक संतापले होते.

# लिंगायत समाजातर्फे गुरूवंदन कार्यक्रम

## आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभणार प्रमुख उपस्थिती

**उरण : बातमीदार**

वीरशैव लिंगायत समाजाचे धर्मगुरु म. नि. प्र. जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि. २१) पनवेलमधील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री व नवी मुंबईचे आमदार गणेश नाईक, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार संदीप नाईक, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर कविता चौतमोल, महाराष्ट्र वीरशैव महासभेचे उपाध्यक्ष एस. एम. पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र बोडके, शरण संकुल नवी मुंबईचे अध्यक्ष जी. बी. रामलिंगय्या यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या वेळी इष्टलिंग धारण कार्यक्रम, कुंभ व शोभायात्रा, स्वामीजींचे गुरुवंदन व तुलाभार कार्यक्रम, महास्वामीजींचा दर्शन सोहळा व महाप्रसाद असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

भाविकांनी अमृत परमशेट्टी (९८६९०२२५५९), माहांतेश हिरेमठ (९३२२२३०४००), रवींद्र अटिन (७३०३१७६२५५), यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : केळवणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शर्मिला दत्तात्रेय माळी यांची निवड झाली असून याबद्दल त्यांचे आमदार महेश बालदी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, दिघाटीचे सरपंच अमित पाटील, भाजप नेते चांगाजी पाटील, दत्तात्रेय माळी, भाजप केळवणे गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, युवा मोर्चा केळवणे जि. प. विभागीय उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, तेजस माळी, कृष्णा म्हात्रे, जगन्नाथ म्हात्रे, धर्मेंद्र भोईर, युवा नेते योगेश घरत, कार्यकर्ता विलास ठाकूर, दिघाटी भाजप गाव सदस्य कैलास पाटील आदी उपस्थित होते.**

# लोकशाही दिनी आठ अर्ज प्राप्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (विकास) गिरीष भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या चार असून मंगळवारी आलेल्या अर्जांची संख्या चार असे एकूण प्राप्त अर्ज आठ होते. त्यापैकी एक अर्ज निकाली काढण्यात आला, तर सात तक्रारी प्रलंबित आहेत.

# कोकण भवन येथे एकदिवसीय कार्यशाळा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयाच्यावतीने नवी मुंबई पसिसरातील शैक्षणिक संस्था व महाविद्यालयात जात प्रमाणपत्र पडताळणी आणि शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बुधवारी (दि. १५) दु. ३ वाजता नवी मुंबई येथील कोकण भवन इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील बैठक कक्षात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सामान्य नागरिकांच्या तक्रारी व अर्जांवर कालमर्यादेत निपटारा व्हावा यासाठी राज्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ‘राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा’ आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सूचनांनुसार या पंधरवड्यामध्ये नागरिकांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयाने नवी मुंबई परिसरातील महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकीय, नर्सिंग, विधी, आर्किटेक्चर महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी तसेच शिष्यवृत्ती संबंधित कामकाज पाहणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

या कार्यशाळेत जात प्रमाणपत्र पडताळणीच्या कार्यपद्धतीबाबत समितीचे सदस्य मार्गदर्शन करणार आहेत, तसेच या कार्यशाळेत विद्यार्थ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्राचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने भरणे, जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रे व पुराव्यांबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना विहित कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास मदत होणार आहे.

यामुळे नवी मुंबई परिसरातील महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकिय, नर्सिंग, विधी, आर्किटेक्चर महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी, तसेच शिष्यवृत्ती संबंधित कामकाज पाहणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य वासुदेव पाटील यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत प्रथमच स्वॅप मूत्रपिंड शस्त्रक्रिया यशस्वी

**नवी मुंबई : बातमीदार**

अपोलो रुग्णालयाने पहिली स्वॅप मूत्रपिंड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केल्याचा दावा केला आहे. या स्वॅपमध्ये उरणमधील सीथा कुटुंब आणि सायनमधीन सैनी कुटुंबाचा सहभाग होता. वैद्यकीय गुंतागुंतीमुळे कुटुंबातील सदस्यांना स्वतःच्या नातेवाईकांना मूत्रपिंड दान करणे अशक्य झाल्यामुळे या दोन कुटुंबाने एकमेकांमध्ये मूत्रपिंडाची अदलाबदल केली.



राहुल सीथा यांच्या मातोश्री सुनंधा सीथा यांनी गुरुदेव सिंह यांच्या पत्नी परविंदर सिंह यांना मूत्रपिंड, तर गुरुदेव सिंह यांनी राहुल सीथा यांना मूत्रपिंड दान केले. शेवटच्या टप्प्यातील मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी मूत्रपिंड प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय असतो. ज्यांना दाता मिळत नाही, त्यांना डायलिसिसवर ठेवले जाते. स्वॅप प्रत्यारोपणामुळे दात्याची कमतरता कमी होण्यास मदत मिळते. सुनंधा सीथा यांना मुलाला म्हणजे राहुलला मूत्रपिंड दान करायचे होते, तर गुरुदेव सैनी यांना आपल्या पत्नीला, परविंदर सैनी यांना मूत्रपिंड दान करायचे होते, परंतु विसंगतीमुळे या दोघांनाही कुटुंबीयांना अवयवदान करता आले नाही.

> **अस्वीकृतीच्या जोखमीसह प्रत्यारोपणासाठी जास्त खर्च आणि उच्च प्रतिरक्षादमन अशी परिस्थिती होती. या स्वॅप प्रत्यारोपणाच्या प्रक्रियेत, दोन्ही प्राप्तकर्त्यांमध्ये डीएसएचे कमी अनुमाप दाखवले आणि यशस्वी होण्याची पातळीदेखील उच्च होती तसेच कमी क्षमतेच्या औषधांची गरज होती आणि संक्रमणाची शक्यतादेखील कमी होती.**
>
> **–डॉ. अमोलकुमार पाटील**


# सीबीडीमध्ये अजगराला जीवदान



**नवी मुंबई : बातमीदार**

सिबिडी सेक्टर ८ येथे दुर्गा माता झोपडपट्टीत शिरलेल्या अजगराला पकडण्यात पुनर्वसू संस्थेला यश आले आहे.

अजगर आढळल्याने परिसरात घबराट पसरली होती. परिसरातील नागरिकांनी अग्निशमन दलाला कळवले होते. अग्निशमन दलाने तातडीने पुनर्वसु फाउंडेशनला कळवले. पहाटे साडेपाच वाजता तातडीने संस्थेचे सदस्य स्वप्नील साटम, अष्टविनायक मोरे व मयुरेश नार्वेकर घटनास्थळी दाखल झाले. अंधार असल्यामुळे बचाव कार्यासाठी अडथळा निर्माण होत होता. तासाभराच्या अथक परिश्रमानंतर सर्पमित्र स्वप्नील यांना अजगराला सुखरूप पकडण्यात यश आले. त्यानंतर अजगराला निसर्गात सोडून देण्यात आले.

# बोर्ली, कोर्लईतील जनावरांमध्ये लम्पीची लक्षणे

## पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचार घ्यावेत; मुरूड तहसीलदारांचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील बोर्ली व कोर्लई गावातील काही जनावरांच्या अंगावर गाठी येणे अशी लम्पी स्कीन आजाराची लक्षणे आढळून आली आहेत. अशी जनावरे आढळल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचार करून घ्यावेत, असे आवाहन मुरूड तहसीलदार व पशुसंवर्धन विभागाने तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती, सरपंच, ग्रामसेवक व तलाठी यांना पत्राद्वारे केले आहे.

बोर्ली व कोर्लई गावामध्ये लम्पीचीसदृश लक्षणे आढळल्याने पशुसंवर्धन विभागामार्फत तातडीने उपयोजन करण्यात येत आहेत. हा रोग पसरू नये व पाळीव जनावरांचा या रोगापासून बचाव व्हावा, यासाठी तालुक्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखाने सज्ज करण्यात आलेले आहेत.

जनावरांच्या अंगावर गाठी येणे, सुरवातीस भरपूर ताप, पायावर सूज येऊन लंगडने अशी लॅम्पी रोगाची लक्षणे आहेत. हा आजार संसर्गाने पसरत असल्याने आजारी जनावरे हे निरोगी जनावरांपासून वेगळे बांधण्यात यावे, आजारी जनावरांना चार व पाण्याची वेगळी व्यवस्था करावी, जनावरांचा बाजार, प्रदर्शनी व जनावर एकत्र आणण्यास प्रतिबंध घालावा, अशा सूचना तहसीलदारांनी केल्या आहेत.

लम्पी आजाराचा प्रसार हा डास, माशा, गोचीड, दूषित चार व पाणी इत्यादीपासून होत असल्याने गावात योग्य ती फवारणी करून घ्यावी, असे आवाहन मुरूड पशुसंवर्धन विभागाने केले आहे. दरम्यान, पशुवैद्यकीय विभागाकडून जनावरे ज्या गोठ्यात बांधली जात आहेत तिथे औषधांची फवारणी करण्याचे काम जोरात सुरू आहे



(छाया : संजय करडे)

**कोर्लई व बोर्ली येथील काही जनावरांमध्ये लम्पी रोगाची लक्षणे दिसून आली आहेत. या जनावरांचे रक्त नमुने पुणे येथील प्रयोग शाळेत पाठवण्यात आले आहेत. तेथील गोठ्यांत प्रतिबंधक औषधांची फवारणी करण्यात येत आहे. लम्पीची लक्षणे दिसताच दवाखान्यात इलाज करून घ्यावा.**
**–डॉ. सुदर्शन पाडावे, पशू वैद्यकीय अधिकारी, मुरूड**

# चोरीच्या रिक्षा विकणारी टोळी माणगावमध्ये जेरबंद

## १२ रिक्षा जप्त, तीन आरोपींना अटक

**माणगाव : प्रतिनिधी**

चोरीच्या रिक्षा विकून फसवणूक करणाऱ्या टोळीतील तीन जणांना माणगाव पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून एकूण १२ ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी मंगळवारी (दि. १३) पत्रकार परिषदेत दिली.

माणगाव उतेखोलवाडी येथील प्रवीण प्रदीप मोने (वय ३६) यांनी गावातील अमित सुरेश बुटे (वय ३६) याच्याकडून जुनी रिक्षा विकत घेतली होती. या रिक्षेचा नंबर व कागदपत्रांबाबत प्रवीण यांनी अमित याच्याकडे विचारणा केली असता त्याने रिक्षेची कागदपत्रे दिली नाहीत तसेच तो संपर्क करण्यास टाळाटाळ करू लागला. त्यामुळे प्रवीण मोने यांनी दिलेल्या तक्रारीवरून सुरेश बुटे याच्यावर बुधवारी (दि. ७) माणगाव पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४०६,४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी अमित सुरेश बुटे याला ताब्यात घेतले. अधिक चौकशीत त्याने सांगितले की, योगेश फाटू गोरेगावकर उर्फ लारा (वय ३९, रा. रबाळे नवी मुंबई), केतन राजू जाधव (वय २३, रा. रबाळे, नवी मुंबई, मूळ रा. ऐरोली, नवी मुंबई) आणि अतिष दिलीप पाटील (वय ३६, रा. रबाळे गाव, नवी मुंबई) हे रिक्षाची चोरी करून त्या रिक्षा अमित बुटे याला देत होते. बुटे या रिक्षा माणगाव येथील लोकांना विकून त्यांची फसवणूक करीत असे. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यातही गुन्हे दाखल आहेत.

### नवी मुंबईत पोहचले धागेदोरे

सदर गुन्ह्यामध्ये आतापर्यंत अमित सुरेश बुटे, केतन राजू जाधव, अतिष दिलीप पाटील यांना माणगाव पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून एकूण चार लाख ३४ हजार (मूळ किंमत १२ लाख) किमतीच्या १२ रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी सहाय्यक निरीक्षक सतिष आस्वर, पोलीस हवालदार रावसाहेब कोळेकर, पोलीस नाईक अल्पेश पवार, पोलीस शिपाई अनिल रिठे, अमोल पोंधे, नाथा दहिफळे, संजीव सुरवसे, निखिल सूर्ते यांच्या पथकाने केली. माणगाव पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.



# पेणमधील अमन स्टार बेकरी बंद; अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील एका हॉटेलमधील पावामध्ये उंदराची विष्टा आढळून आल्याने अन्न व औषध प्रशासन अधिकारी लक्ष्मण दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी वि. श्री. निकम यांनी रामवाडी येथील अमन स्टार बेकरी बंद करण्याचे लेखी निर्देश देऊन बेकरी मालकाला २० हजारांचा दंड ठोठावला. तर विशाल बेकरी मालकास नोटीस देऊन बेकरी बांधकामात आणि उत्पादन प्रक्रियेमध्ये योग्य ते बदल करण्याचे लेखी आदेश दिले.



(छाया : अनिस मनियार)

अन्न व औषध प्रशासन अधिकारी लक्ष्मण दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ सप्टेंबर रोजी अन्न व औषध विभागाने पेण रामवाड़ी येथील बेकऱ्यांचा पहाणी दौरा करून कारवाईला सुरवात केली. सकाळी १० वाजता सुरु झालेली ही कारवाई तब्बल सात तास सुरू होती. या कारवाईत रामवाडी येथील अमन स्टार बेकरी यांना व्यवसाय बंद करण्याचे लेखी निर्देश देऊन २० हजारांचा दंड ठोठावण्यात आला. तर विशाल बेकरीच्या मालकास नोटीस देऊन बेकरी बांधकामात आणि उत्पादन प्रक्रियेमध्ये योग्य ते बदल करण्याचे आदेश दिले. तसेच अन्न सुरक्षा कायदा २००६ अंतर्गत स्वच्छता नियमांचे पालन करुनच व्यवसाय सुरू करता येईल, असे निर्देश या बेकरी मालकास दिले आहेत. पाव विकणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करुन प्रत्येकी १५०० रुपये दंड आकारण्यात आला आहे, तर संबंधित हॉटेलचे ऑडिट करुन हॉटेल मालकासही दंड भरण्यासाठी नोटीस देण्यात आल्याचे अन्न व औषध प्रशासन अधिकारी वि. श्री. निकम यांनी सांगितले.

या वेळी बेकरी व्यावसायिक आणि तेथे काम करणाऱ्या कामगारांची कागदपत्रे, ओळखपत्रे तपासण्यात आली. तसेच बेकरी व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची तपासणी करुन तेथील पदार्थांचे नमूने तपासणीसाठी घेण्यात आले.

दरम्यान, बेकरी व्यावसायिक आणि त्यांच्या कामगारांसाठी अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत लवकरच स्वच्छता कार्यशाळा आयोजित केली जाणार असल्याचे निकम यांनी सांगितले.

# कर्जत–रसायनी बस सुरू करावी

## ▪ विकास संघर्ष समितीचे आगार प्रमुखांना निवेदन

**कर्जत : बातमीदार**

खालापूर तालुक्यातील रसायनी येथील पिल्लई महाविद्यालयात कर्जत येथून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या विद्यार्थ्यांसाठी रोज सकाळी आणि संध्याकाळी बस गाड्या सोडण्यात याव्यात, अशी मागणी कर्जत विकास संघर्ष समितीने येथील एसटी आगार प्रमुखांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीला कर्जत आगारानेही साकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

कर्जत येथून एसटीने रसायनी येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दोनशेच्या आसपास आहे. कोरोनापूर्वी कर्जत एसटी आगारातून रसायनीसाठी सकाळी आणि संध्याकाळी दोन एसटी गाड्या सोडल्या जात होत्या, मात्र त्या गाड्या लॉकडाऊन संपल्यानंतर पुन्हा सुरु करण्यात आल्या नाहीत. सध्या कर्जत येथून रसायनी मार्गे पेण आणि अलिबागकडे जाणाऱ्या एसटी गाड्यांची संख्या मर्यादित असल्याने विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयात पोहचण्यासाठी सकाळच्या वेळी मोठी कसरत करावी लागते. एसटीचा पास विद्यार्थ्यांना परवडत असतो, मात्र एसटी गाड्या नसल्याने विद्यार्थ्यांना मोठा भुर्दंड सहन करावा लागत आहे. अनेक विद्यार्थ्यांना अधिकचा खर्च करून खासगी वाहनातून महाविद्यालयात जावे लागते. त्यात अनेकदा महाविद्यालयांत पोचायला उशीर होतो.

कर्जत येथून रसायनी येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एसटी आगाराने सकाळच्या वेळी दोन आणि सायंकाळच्या वेळी दोन कायमस्वरूपी बस सोडाव्यात, या मागणीचे निवेदन कर्जत विकास संघर्ष समितीने आगार प्रमुख शंकर यादव यांना दिले. या वेळी संघर्ष समितीचे कृष्णा जाधव, सतीश पिंपरे यांच्यासह पालक उपस्थित होते.

# सरकारी अधिकारी असल्याचे सांगून दागिने पळविणाऱ्या महिलेस अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरकारी अधिकारी असल्याचे सांगून सोन्याचे पळविणाऱ्या महिलेस रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने (एलसीबी) अटक केली. मंगल रविंद्र मोरे उर्फ विमल श्रीकांत सुर्यवंशी (वय ५४) असे या महिलेचे नाव आहे. ही महिला मुळची सातारा जिल्ह्यातील जवळी तालुक्यातील आहे. तिच्याकडून दोन लाख ८५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. तिने अलिबाग शहरामध्ये अन्य एका ठिकाणी तसेच पोयनाड परिसरामध्ये अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील महिलेने तिच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलीस अधीक्षकांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश कदम यांच्या नेतृत्वाखालील पथक या प्रकरणाचा तपास करीत होते. पोलीस हवालदार प्रशांत दबडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तसेच तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी महिलेस ताब्यात घेऊन तिची चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली.

गुन्हे

आपण सरकारी अधिकारी असून नुकतीच आपली बदली झाल्याचे सांगून ही महिला घर भाड्याने घेत असे. भाड्याच्या रूममध्ये त्याच व्यक्तीच्या नावावर नवीन टीव्ही, फ्रीज, वायफाय विकत घेत असे. गरीब, गरजूंना नोकरीस लावण्याचे अमिष दाखवून त्यांच्याकडून रोख रक्कम घेते असे. घरकाम करण्यासाठी घरी येणाऱ्या महिलेचा संपुर्ण विश्वास संपादन केल्यानंतर दागिने गावी विसरलेले असून तुमचे दागिने द्या, मी लगेच जावून येते, असे सांगून ही महिला सोन्याचे दागिने घेवून पलायन करीत असे. एलसीबीने या महिलेला अटक केली. अलिबाग, लोणावळा (जि. पुणे), बर्दापूर (बीड) तसेच लातूर जिल्ह्यातील मुरूड या ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली या महिलेने दिली आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा रायगडचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश कदम, सहाय्यक फौजदार दीपक मोरे, हवालदार प्रशांत दबडे, अमोल खंडारे, अमोल हंबीर, अभियंती मोकल, सायबर सेल पोलीस शिपाई अक्षय पाटील व तुषार घरत यांनी आरोपी महिलेला अटक केली.

# किरवलीत अपंगांना ब्लँकेट वाटप

**कर्जत : बातमीदार**

पनवेल तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते मनोहर रतन म्हात्रे यांनी त्यांच्या मातोश्री विमल म्हात्रे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त किरवली (ता. कर्जत) ग्रामपंचायत हद्दीतील ५० अपंगांना चादर आणि ब्लँकेट वाटप केले.



अपंग संघटनेच्या पुढाकराने किरवली ग्रामपंचायत हद्दीतील देऊळवाडी येथील मंदिरात झालेल्या या कार्यक्रमाला मनोहर रतन म्हात्रे, चंद्रकांत गायकर, जगदिश मालुसरे, धनराज चौधरी, गोविंद कांबळी, सुरेश चव्हाण, योगेश बेडेकर, अपंग संघटनेचे अमर साळोखे, पंकेश भोईर, धनाजी हडप आदी उपस्थित होते.

# कर्जत वडवलीतील दिव्यांग विद्यार्थ्याला व्हीलचेअर भेट

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वडवली प्राथमिक शाळेतील दिव्यांग विद्यार्थी सार्थक सावंत याला नवी मुंबईतील श्री साई ट्रस्ट या सेवाभावी संस्थेने व्हीलचेअर भेट दिली. त्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले यांनी शिफारस केली होती.



श्री साई ट्रस्टकडून गेली १० वर्षे कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचे कार्य सुरु आहे. सार्थक सावंत या विद्यार्थ्यांबद्दल वडवली शाळेचे मुख्याध्यापक परचुरे यांनी माणगाव तर्फे वरेडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले यांना माहिती दिली.

घुले यांनी याबाबत श्री साई ट्रस्टकडे प्रस्ताव ठेवला आणि ट्रस्टकडून वडवली शाळेत व्हीलचेअर वाटप कार्यक्रम करण्यात आला. त्यावेळी ट्रस्ट नवी मुंबईच्या संचालिका राधिका घुले, वडवली शाळेचे मुख्याध्यापक पाचपुते, शिक्षक गांजाळे यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. याबद्दल श्री साई ट्रस्टचे आभार मानण्यात आले.

श्री साई ट्रस्टची सामाजिक बांधिलकी



(छाया : संतोष पेरणे)

# बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत भाविकांची गर्दी



## मंदिरात फुलांची सजावट व आकर्षक रोषणाई



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

अंगारकी चतुर्थीनिमित्त बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यासाठी मंगळवारी (दि. १३) पालीत भाविकांची गर्दी उसळली होती. श्री. बल्लाळेश्वराची मूर्ती फुलांनी सजवली होती तर मंदिर व परिसरात फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

अष्टविनायकांपैकी पाली हे एक प्रख्यात धार्मिक स्थळ आहे. संकष्टी चतुर्थीच्या दिवशी मंगळवारी येथील बल्लाळेश्वर मंदिर भाविक, भक्तगणांनी फुलून निघाले होते. गणेशोत्सवाचे वातावरण असल्याने बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रायगड जिल्ह्यासह मुंबई, ठाणे, पुणे आदी परिसरातील भाविक व पर्यटक मोठ्या संख्येने पालीत दाखल झाले होते. गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या गाड्यांमूळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. मात्र पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते. पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# कर्जतच्या मृदुल चंदनचे 'नीट' परीक्षेत उज्ज्वल यश; एमबीबीएस होण्याचा मानस

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील मृदुल विलास चंदन या विद्यार्थीनीने वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी असणाऱ्या नीट परीक्षेत ९९.८१ टक्के गुण मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. संपूर्ण भारतात तिची रँक ३१४६ आहे. तिला एमबीबीएस व्हायची इच्छा आहे.



(छाया : विजय मांडे)

मृदुल चंदन ही कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडियमची विद्यार्थिनी असून तिने चौथी व आठवीमध्ये शिष्यवृत्ती मिळविली होती. शालांत परीक्षेत तिने ९५ टक्के गुण मिळविले होते. तर बारावी परीक्षत ९४.१७ टक्के गुण मिळविले होते. मृदुलचे वडील बांधकाम व्यावसायिक असून काकी नगरसेविका आहेत. तिचे मामासुद्धा नगरसेवक आहेत. मृदुलचे चुलत आजोबा रमेश चंदन हे कर्जतचे पहिले नगराध्यक्ष होते.

नीट परीक्षेत मिळविलेल्या या यशाबद्दल मराठा शिक्षण प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मृदुल चंदन हिच्या निवासस्थानी तिचा सत्कार करून अभिनंदन केले.

# गौरा गणेश दर्शन


महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचा मार्केटचा राजा, पनवेल


नवनाथ मित्र मंडळ, पनवेल


राजमुद्रा मित्र मंडळ, कुंभारवाडा युवक मंडळ, पनवेल


एकता मित्र मंडळ, पनवेल लाईन आळी






साई प्रसाद को. ऑप. सोसायटी, खांदा कॉलनी


अष्टविनायक मित्र मंडळ, पनवेल





पनवेल : अनंत चतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता झाली असली तरी पनवेल तालुक्यात मंगळवारी साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतींचे आगमन झाले. भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सुकापूर, तळोजा, मालडुंगी, चिंचवण, शिरवली, उसर्ली या ठिकाणी विराजमान झालेल्या गौरा गणरायांचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप नेते राजेश पाटील, निर्दोश केणी, ज्ञानेश्वर पाटील, बुवाशेठ भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.










उरण : भाजपचे नवघर बूथ अध्यक्ष तथा ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष जयप्रकाश पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गौरा गणपतीचे पाटील कुटुंबियांनी दर्शन घेतले.





सरपंच सोनिया मयूर घरत, दिघोडे, उरण


सरपंच नूतन कुलदीप नाईक, कळंबुसरे, उरण

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com